# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २५.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २४/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३८२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,३९,३५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २४/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ४३.४४ लिटर दारू असा एकुण २२,१८०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २४/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ४,०८०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात गुन्हे:—**

दि. २४/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली ग्रा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील फिर्यादी हा तिची मोसा क्र एमएच ३८ आर ३५५१ ने हिंगोली कडे जात असतांना अकोला बायपास म्हाळसाई पेट्रोलपंप जवळ अचानक समोरून बजाज पल्सर च्या चालकाने तिच्या ताब्यातील मोसा भरधाव वेगात हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोसा ला समोरून जोराची धडक देवुन फिर्यादीस गंभीर जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस पोलीस तपास करित आहेत.

**फसवणुक संदर्भाने दाखल गुन्हे :—**

दि. २४/१२/२०२२ रोजी पोस्टे औंढा नागनाथ येथे यातील फिर्यादी धनंजय पि विठठलराव पवार वय ४६ वर्ष व्य.अंतर्गत लेखा परिक्षक जि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहाकारी बॅक मुख्य कार्यालय परभणी रा पळशी ता सेनगाव जि हिंगोली यांचे फिर्याद वरून कलम ४०९,४२०,४६७,४६८,४७१,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांनी संगणमत करून दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा औंढा ना येथे पदावर असतांना पदाचा गैरवापर करून खोटी व बनावटी कागदपत्र तयार करून पैशाचा अपहार करून बॅकेची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात औंढा नागनाथ पोलीस तपास करित आहेत.